| VOL- X | ISSUE- III | MARCH | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# शिक्षक प्रशिक्षण प्रात्यक्षिक कार्यात कृषी विषयक कार्यावर आधारित प्रशिक्षणाचा समावेश काळाची गरज -एक अभ्यास

**प्रा. डॉ. शैलजा मंडले**
सहाय्यक प्राध्यापक
बी. ए. बी. एड्. विभाग
महावीर महाविद्यालय,
कोल्हापूर.

*प्रस्तुत संशोधनात शिक्षक-प्रशिक्षण प्रात्यक्षिक कार्यात कोल्हापूर शहरातील महावीर महाविद्यालयातील चार वर्षीय एकात्मिक बी. ए. बी. एड. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिक कार्याचा शोध घेऊन प्रत्येक वर्षातील प्रत्येकी ५ प्रशिक्षणार्थी एकूण २० प्रशिक्षणर्थीची नमुना निवड केली. प्रस्तुत संशोधनसाठी माहिती संकलनासाठी प्रश्नावली व मुलाखतीचा वापर केला आहे.*

*प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा वापर करुन पुढील निष्कर्ष काढण्यात आले आहेत. बी.ए.बी.एड. प्रात्यक्षिक कार्यात वाचन, लेखन, सराव पाठ, अहवाल लेखन यांचा समावेश आहे. परंतु बरेच प्रशिक्षणार्थी हे ग्रामीण भागातून प्रवेशित झाल्यामुळे त्यांचा ओढा हा निसर्गाकडे दिसून येतो. त्यामुळे प्रशिक्षण पूर्ण करताना प्रशिक्षणार्थींना अध्ययनात रुची येत नसल्याची समस्या अधिक जाणवते, असे आढळून आले आहे.*

**प्रस्तावना :**

औद्योगिक क्रांती आणि तंत्रज्ञानाच्या प्रगती आधीच्या काळात नैसर्गिक साधन संपत्ती जपून वापरली जात होती. रोजच्या जगण्यासाठी आपण निसर्गाशी जोडलेले होतो. पण उद्योग, विकास, तंत्रज्ञान, शहरी संस्कृती यांच्यामध्ये हे अलवार नाते बिघडले आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागविण्यासाठी अन्नधान्याची गरज भासायला लागली आहे. शेतीसाठी असलेली संकरित बियाणाचं महत्त्व वाढीला लागले आहे रसायनांचा वापर वाढल्यामुळे खाण्यासाठी कसदार अन्न नाही. कष्टही नाही. शरीर आजारांना नवनव्या जिवाणूंना बळी पडत आहे.

सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या धान्य आणि भाजीपाला यांना महत्व येऊ लागले आहे.

**समस्या विधान**

शिक्षक प्रशिक्षण कार्यात प्रशिक्षणार्थीना कृषी विषयक प्रात्यक्षिक कार्याचा समावेश काळाची गरज -एक अभ्यास.

**पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या :**

१) शिक्षक प्रशिक्षण - चार वर्षीय एकात्मिक अभ्यासक्रमातील शिक्षक प्रशिक्षण
२) प्रात्यक्षिक - कृषीवर आधारित प्रशिक्षण कार्य
३) कृषी विषयक - सेंद्रिय शेतीची माहिती व तिचे महत्व
४) प्रशिक्षणार्थी - चार वर्षीय एकात्मिक अभ्यासक्रमांतील प्रशिक्षणार्थी

**संशोधनाची व्याप्ती :**

प्रस्तुत संशोधन हे चार वर्षीय एकात्मिक अभ्यासक्रमातील प्रथम, व्दितीय, तृतीय आणि चतुर्थ वर्षातील प्रशिक्षापुरते मर्यादित आहे. सन २०२२- २३ या वर्षापुरते मर्यादित आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) चार वर्षिय बी. ए. बी. एड्. एकात्मिक अभ्यासक्रमांतील प्रात्यक्षिक कार्याची माहिती घेणे.
२) चार वर्षिय बी. ए. बी. एड्. एकात्मिक अभ्यासक्रमांतील प्रशिक्षणार्थी कोणत्या भागातून प्रवेशित आले आहेत याचा शोध घेणे.
३) कृषीवर आधारित प्रात्यक्षिक कार्याची गरज याचा शोध घेणे.

**संशोधनाची गरज :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार भारताचा सांस्कृतिक वारसा जपून ठेवावा. तसेच भारताच्या दुर्गम भागातून, खेड्यापाड्यांतून आलेल्या विद्यार्थ्यांचा विकास व्हावा. शिक्षक प्रशिक्षणातून निर्माण् झालेल्या प्रशिक्षणार्थीला सेंद्रिय शेतीचे

महत्व पटावे. पुढील भावी पिढी तयार करताना शाश्वत विकासाचे महत्व जाणावे.

**संशोधनाचे महत्व :**

शिक्षक प्रशिक्षणार्थीना भारतातील पारंपारिक कृषी व्यवसायाचे महत्व समजले तर भारतातील स्थानिक शेती व स्थानिक वाणांना (बियाणांना) महत्व येईल व भावी पिढीचे आरोग्य चांगले राहील. रासायनिक खतांचा वापर कमी होईल. वैश्विक बदलला तोंड देण्याचा उपाय निर्माण होईल.

**सर्वेक्षण पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

**नमुना निवड** - चार वर्षीय बी. ए. बी. एड्. एकात्मिक अभ्यासक्रमांतील प्रत्येक वर्षातील ग्रामीण भागातील प्रशिक्षणार्थीची निवड सहेतूक पद्धतीने केली आहे.

**संख्याशास्त्रीय परिणामे :**

संशोधकाने मिळालेली माहिती संख्याशास्त्रीय परिमाणांचा वापर करुन त्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले अर्थनिर्वचनासाठी टक्केवारी (%) परिणाम वापरले आहे.

**संशोधनाची कार्यपद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने कोल्हापूरमधील महावीर महाविद्यालयातील चार वर्षीय बी. ए. बी. एड्. एकात्मिक अभ्यासक्रमांतील प्रशिक्षणार्थींची निवड केली आहे. मार्गदर्शकांच्या सहाय्याने प्रश्नावली तयार केली. प्रशिक्षणार्थीकडून भरून घेतली. प्रश्नावलीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे व सांख्यकीमधील टक्केवारीच्या सहाय्याने लिखित अनुमान काढले.

**निष्कर्ष :**

**उद्दिष्ट क्रमांक १ —**

चार वर्षीय बी. ए. बी. एड्. एकात्मिक अभ्यासक्रमांतील प्रात्यक्षिक कार्याची माहिती घेणे. सदर चार वर्षाच्या बी. ए. बी. एड्. प्रात्यक्षिक कार्यात सूक्ष्म अध्यापन, कृतीसंशोधन, अभ्यास भेट, मानसशास्त्रीय चाचण्या, सराव पाठ, शालेय आंतरवासिता यावर आधारित प्रात्यक्षिक कार्य आहे.

**उद्दिष्ट क्रमांक २ -**

चार वर्षीय बी. ए. बी. एड्. एकात्मिक शिक्षक प्रशिक्षणार्थी कोणत्या भागातून प्रवेशित झाले आहेत याचा शोध घेणे.

१) चार वर्षीय बी. ए. बी. एड्. एकात्मिक अभ्यासक्रमांसाठी 95% विद्यार्थी हे आजूबाजूच्या ग्रामीण संस्कृतीमधून प्रवेशित झाल्याचे आढळून आले आहे.

२) 95% शिक्षक प्रशिक्षणार्थीचे पालक कृषीवर आधारित व्यवसाय करणारे आढळून आले आहेत.

३) 95% शिक्षक प्रशिक्षणार्थीचे राहणीमान ग्रामीण संस्कृतीशी मिळते-जुळते असल्याचे आढळून आले आहे.

**उद्दिष्ट क्रमांक ३ —**

कृषीवर आधारित प्रात्यक्षिक कार्य शिक्षक प्रशिक्षणामध्ये सुचविणे.

१) शिक्षक प्रशिक्षणार्थीसाठी प्रात्यक्षिक करण्यासाठी प्रत्येक शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयाला स्वत: ची शेती असणे आवश्यक करावे.

२) पदमश्री राहीबाई पोपेरे यांच्यासारख्या बीजमातांचे प्रकल्प पहाण्यासाठी नियोजन करावे.

३) स्थानिक जातीचे बियाणं कसे रुजवावे, साठवावे याचे ज्ञान शिक्षक प्रशिक्षणार्थीना द्यावे.

प्रस्तुत संशोधनातून शिक्षक प्रशिक्षणार्थीना शाश्वत विकासाची मूल्य कृषी विषयक प्रात्यक्षिक कार्यातून रुजवली जावीत.भारतातील ग्रामीण संस्कृतीची जपणूक हाईल श्रमप्रतिष्ठा जपेल. जमिनीचा कस कमी होत चालला आहे. शेतीसाठी जुनी पारंपारिक बियाणं नष्ट होत चालली आहेत. पुढील पिढीसाठी वारसा जपण्याचे काम शिक्षक प्रशिक्षणार्थीकडून होईल.

**संदर्भ सूची :**

1. पंडीत बी. बी. (2005) शिक्षणातील संशोधन (संख्यात्मक आणि गुणात्मक) पुणे नित्यनूतन प्रकाशन.
2. Wikipedia
3. राहीबाई सोमा पोपेरे माहिती मराठी